दि.२३ जून, २०१९ रोजी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी सदर क्षेत्रातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी अथवा दोन तासांची सवलत देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक: मतदान २०१९/प्र.क्र.५५/कामगार-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ जून, २०१९

<u>**संदर्भ**</u> :- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/मनप-२०१९/प्र.क्र.३/का.५, दि.१९ जून,२०१९ रोजीचे पत्र.

शासन परिपत्रक

आपल्या देशाने लोकशाही पध्दती स्विकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व लोकांनी प्रत्येक निवडणुकीमध्ये १०० टक्के मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा,१९५१ च्या परिच्छेद १३५ब नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणुकांमध्ये असे दिसून आले आहे की, संस्था/ आस्थापना इ. भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे दि. २३ जून, २०१९ रोजी महानगरपालिका/ नगरपरिषदा/नगरपंचायती तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्यामध्ये सार्वत्रिक व पोट निवडणूक घेतली जाणार आहे. सदर निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

I) निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना मग ते कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही त्यांना निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

II) सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने,दुकाने इत्यादींना लागू राहिल (उदा.खाजगी कंपन्या या मधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाटयगृहे, व्यापार,औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स इ.)

III) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी केवळ दोन ते तीन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत त्यांनी संबंधित महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहिल.

IV) वर नमूद केल्यानुसार उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींच्या मालकांनी / व्यवस्थापनाने वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुध्द योग्य कारवाई करण्यात येईल.

४. सदर परिपत्रक राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे क्रमांक रानिआ/मनपा-२०१९/प्र.क्र.३/का.५ दि.१९ जून, २०१९ रोजीच्या पत्रास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६२११६४७१५५०१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2019.06.21 16:49:07 +05'30'

(डॉ.श्री.ल.पुलकुंडवार)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत - उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, नवीन प्रशासकीय इमारत, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
२. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३. कामगार आयुक्त, वांद्रे, मुंबई-५१ (निवडणूक होणार्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
४. संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, वांद्रे, मुंबई (निवडणूक होणार्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
५. संचालक, बाष्पके, वांद्रे, मुंबई, (निवडणूक होणाऱ्या ठिकाणी संबंधितांना सुचना देण्याबाबत कार्यवाहीच्या विनंतीसह अग्रेषित)
६. आयुक्त, पुणे, कोल्हापूर, ठाणे, नाशिक, परभणी, चंद्रपूर, नागपूर, अहमदनगर, भंडारा, चंद्रपूर, हिंगोली, बुलढाणा, औरंगाबाद, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, रायगड, जळगांव, नांदेड, महाराष्ट्र राज्य.
७. जिल्हाधिकारी, पुणे, कोल्हापूर, ठाणे, नाशिक, परभणी, चंद्रपूर, नागपूर, अहमदनगर, भंडारा, चंद्रपूर, हिंगोली, बुलढाणा, औरंगाबाद, यवतमाळ, वर्धा, गोंदिया, रायगड, जळगांव, नांदेड, महाराष्ट्र राज्य.
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई यांना व्यापक प्रसिध्दी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
९. कामगार विभागातील सर्व कार्यासने

प्रत माहितीसाठी :

१ मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
२ मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
३ मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

परिशिष्ट-१ (महानगरपालिका पोट निवडणूक)

अ.क्र.	**जिल्हा**	**महानगरपालिकेचे नाव**	**प्रभाग/जागा क्र.**
१	पुणे	पुणे	१ अ
			४२ अ व ४२ब
२	कोल्हापूर	कोल्हापूर	२८
			५५
३	ठाणे	उल्हासनगर	१ ब
४	नाशिक	मालेगाव	६ क
५	परभणी	परभणी	३ ड
			११ अ
६	चंद्रपूर	चंद्रपूर	६ ब
			१३ ब

परिशिष्ट-२ (नगरपरिषद/नगरपंचायती सार्वत्रिक/पोट निवडणूक)

अ.क्र.	**जिल्हा**	**नगरपरिषद/ नगरपंचायतीचे नाव**	**प्रभाग/जागा क्र.**
१	नागपूर	बुटीबोरी	सार्वत्रिक
२	परभणी	मानवत	पोट निवडणूक (अध्यक्ष)
		सोनपेठ	१ ब
३	अहमदनगर	संगमनेर	१० अ
		श्रीरामपूर	९ ब
		जामखेड	१४
४	भंडारा	लाखांदूर	१६
५	चंद्रपूर	मूल	६ अ
६	हिंगोली	हिंगोली	११ ब
७	बुलढाणा	जळगांव-जामोद	८ अ
८	औरंगाबाद	सोयगाव	१६
९	यवतमाळ	दारव्हा	२ अ

परिशिष्ट-३ (जिल्हा परिषद व पंचायत समिती पोट निवडणूक)

अ.क्र.	**जिल्हा**	**तालुका**	**निवडणूक विभागाचा क्रमांक व नाव**
१	पूणे	इंदापूर	७५-बावडा-लाखेवाडी
२	हिंगोली	कळमनुरी	१३- येहळेगांव(तु.)
३	वर्धा	सेलू	१४-झडशी
		समुद्रपूर	३६-मांडगांव

४	भंडारा	पवनी	४३-ब्रम्ही
		लाखनी	२९-पालांदूर
५	गोंदिया	गोदिया	१२-आसोली

परिशिष्ट-४

अ.क्र.	**जिल्हा**	**पंचायत समितीचे नाव**	**निर्वाचक गणाचा क्रमांक व नाव**
१	रायगड	पेण	४६-वडखळ
२	पूणे	हवेली	७४-वाडेबोल्हाई
३	कोल्हापूर	कागल	६६-माद्याळ
४	जळगाव	चाळीसगाव	१२४-मेहूणबारे
५	अहमदनगर	नेवासा	६९-सोनाई
		कर्जत	१३८-कोरेगाव
६	नांदेड	बिलोली	६७-अटकळी
		माहूर	०१-वाई(बा)
		मुखेड	१०३-जांब(बु.)
७	हिंगोली	औंढा ना.	६७-असोला तर्फे लाख
८	गोंदिया	अर्जुनी मोरगाव	१००-माहुरकुडा
९	वर्धा	हिंगणघाट	९९-वडनेर